**ठळक बातम्या**

- राज्यात शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन, राज्यातल्या ९ शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारानं गौरव,
- प्राथमिक शाळांमधलं विद्यार्थी गळतीचं प्रमाण जवळपास शून्यावर आल्याबद्दल राष्ट्रपतींकडून शिक्षकांचं अभिनंदन
- दहीहंडीचा थरार अनुभवताना मुंबई-ठाण्यात १२८ गोविंदा जखमी, दोन जणांचा मृत्यू

**आणि**

- नाशिक जिल्ह्यातल्या आणखी १३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित

**<><><><><><>**

शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करत शिक्षक दिन आज राज्यात सर्वत्र साजरा करण्यात आला. राज्यात विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमांच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत. एक संक्षिप्त वृत्तांत…

***होल्ट व्हाईस कास्ट***

*(उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले, तसंच शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात ४२ शिक्षकांना पद्मभूषण डॉक्टर जे. पी. नाईक तंत्रशिक्षण पुरस्कारानं सन्मानित केलं. पुढच्या वर्षापासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावे उत्कृष्ट सामाजिक सेवा कार्य पुरस्कार आणि आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्काराची घोषणाही त्यांनी केली.*

*अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीनं जिल्ह्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १४ शिक्षक आणि २ केंद्रप्रमुख यांना जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते शिक्षक पुरस्कार वितरित करण्यात आले.*

*काही ठिकाणी अभिनव उपक्रम राबवण्यात आले.*

*शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत विविध ठिकाणांहून तक्रारी प्राप्त होत असताना नंदूरबारच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाडीत जाऊन विद्यार्थ्यांसोबत शालेय पोषण आहाराचा आस्वाद घेतला.* ***तुळजापूर*** *नगर परिषदेच्या सर्व शाळा वातानुकूलित करण्याची घोषणा तुळजापूरचे नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी आज केली.*

दरम्यान, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या, मात्र नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसह शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचं लक्ष वेधण्यासाठी सोलापूर, बीड, नंदूरबार याठिकाणी विविध शिक्षक संघटनांच्या वतीनं जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे काढण्यात आले.

**सोलापूरात** मागण्यांचं निवेदन शिक्षकांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलं. तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांनी शिक्षक दिनानिमित्त त्यांचा सन्मान केला.

**<><><><><><>**

राज्यातल्या ९ शिक्षकांना आज राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत त्यांना पदक, रोख रक्कम आणि मानपत्र प्रदान करण्यात आलं. १२ वर्षांपूर्वी साडे ४ टक्क्यांवर असलेलं प्राथमिक शाळांमधलं विद्यार्थी गळतीचं प्रमाण जवळपास शून्यावर आलं आहे. याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्षकांचं अभिनंदन केलं. यावेळी त्यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कर्तृत्वाला

उजाळा दिला. स्वतः शिक्षक म्हणून काम करताना आलेले अनुभवही राष्ट्रपतींनी सांगितले.

बीडच्या कविता गिट्टे, नाशिकच्या कुंदा बच्छाव, लातूरचे वैभव कुलकर्णी, साताऱ्याचे शिवप्रसाद टिंगरे, आयआयटी मुंबईतले विक्रम विशाल, वर्ध्याचे अमर ताकसांडे, सोलापूरचे संदीपान नरोटे, धाराशिवचे किरण झरकर आणि नाशिकच्या अर्चना जाधव यांचा पुरस्कार विजेत्यांमधे समावेश आहे. पुरस्कारप्राप्त शिक्षक वैभव कुलकर्णी यांनी आकाशवाणीशी बोलताना आनंद व्यक्त केला.

**होल्ड बाईट ...**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी संवाद साधला.

**<><><><><>**

उत्तर मुंबईतल्या दुसऱ्या कौशल्यविकास केंद्राचं उद्घाटन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी आज कांदिवली इथं केलं. उत्तर मुंबईत विविध ठिकाणी अशी अनेक केंद्रं सुरू करण्याची, तसंच विविध कंपन्यांच्या सहकार्यानं रोजगार मेळावे भरवण्याची योजना असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यासाठी वेगवेगळ्या औद्योगिक संघटनांबरोबर काम करणार असल्याचंही गोयल म्हणाले.

**<><><><><>**

लोकशाहीच्या प्रक्रियेत स्वायत्त न्यायसंस्था आणि माध्यमांचं महत्त्व मोठं आहे आणि सध्या माध्यमांच्या विश्वासार्हतेवर सगळ्यात मोठं प्रश्नचिन्ह आहे, असं मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मांडलं. नागपूरच्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या माध्यम परिषदेत, 'माध्यमं, नेतृत्व आणि नवी जागतिक व्यवस्था' या विषयावर ते बोलत होते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका आणि प्रसारमाध्यमं, या लोकशाहीच्या ४ स्तंभांच्या जबाबदाऱ्या राज्यघटनेनं स्पष्ट केल्या

आहेत. राजकारण आणि राजकीय पक्ष हे लोकशाहीचं सगळ्यात मोठं बलस्थान आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात दहीहंडीचा मोठा उत्साह आज पहायला मिळाला. मुंबईत गिरगाव, लालबाग आणि दादरपासून ते ठाण्यातल्या भव्य मैदानांपर्यंत सर्वत्र धाक्कुमाकुमच्या ठेक्यावर नृत्य करणाऱ्या विविध गोविंदा पथकांमधे हंडी फोडण्याची चुरस होती. राजकारण आणि मनोरंजन जगतातल्या अनेक मान्यवरांनी उत्सवाला हजेरी लावून गोविंदांना प्रोत्साहन दिलं. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी, सक्षम आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी योगदान द्यावं, दहीहंडीच्या उत्सवामधून 'नशामुक्त महाराष्ट्र'  संकल्पनेला बळकटी देण्याचं काम करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहीहंडी उत्सवात केलं. मुख्यमंत्र्यांनी वरळी, दादर, घाटकोपर येथे आयोजित विविध दहीहंडी उत्सवांना भेट दिली. मुंबईच्या महापौर रितू तावडे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

दहीहंडीदरम्यान झालेल्या अपघातांमधे आज मुंबईच्या मालाडमधल्या मालवणी भागात कच्ची भिंत पडून ७ वर्षाच्या एका मुलाचा मृत्यू झाला, तर पुण्यात काल लोखंडी कमान कोसळून एक महिला मृत्यूमुखी पडली. या उत्सवादरम्यान मुंबईत ११८ गोविंदा जखमी झाले. त्यापैकी ८५ जणांवर उपचार सुरू आहेत, तर ३३ जणांना उपचारांनंतर घरी सोडण्यात आलं. ठाण्यात जखमी झालेल्या १० गोविंदांना रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व महानगरपालिकांमधे पारलिंगी व्यक्तींसाठी सार्वजनिक ठिकाणी वेगळी स्वच्छतागृहं बांधण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी मुंबईत वार्ताहरांना ही माहिती दिली. या

कामासाठी १० कोटी रुपयांची तरतूद केली असून महानगरपालिकांकडून कामाचे प्रस्ताव मागवण्यात आले आहेत.

**<><><><><><>**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्यांची दखल राज्य सरकारने घेतली आहे, न्यायालयीन प्रक्रियेत सर्व निर्णय टिकावेत म्हणून कायदेशीर बाबी तपासून त्यावर कार्यवाही सुरू आहे, जरांगे यांनी उपचार घेण्यास नकार देऊन टोकाचं पाऊल उचलू नये, असं आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री आणि आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे.

मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटी शासनाच्या प्रतिनिधी मंडळाबरोबर चर्चा झाल्यानंतरही उपोषण सुरुच ठेवलं आहे. राज्य सरकारने आश्वासनं पाळली नाहीत असा आरोप जरांगे यांनी केला असून पात्र मराठा समाजाला 'कुणबी' प्रमाणपत्रे देण्याबाबत येत्या १२ सप्टेंबरपर्यंत आदेश काढावा, अशी मागणी केली आहे.

**<><><><><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या १३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने जिल्हा कृषी विभागानं निलंबित केले आहेत. आतापर्यंत १५४ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. या कृषी सेवा केंद्रांच्या तपासणीमध्ये दर फलक आणि साठाफलक अद्ययावत नसणं, शेतकऱ्यांना खरेदीच्या पावत्या न देणं अशा अनेक प्रकारच्या त्रुटी आढळल्यानं ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

नाशिक मध्ये विसापूर इथं आश्रमशाळेत मृत्यू झालेल्या मुलीच्या कुटुंबाला राज्य आदिवासी विभागानं पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. सेंट्रल किचनमधल्या निकृष्ट भोजनामुळे या मुलीला त्रास होऊन उलट्या झाल्या आणि

तिचा मृत्यू झाला असा आरोप तिच्या कुटूंबियांनी केला होता. या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

**<><><><><>**

नंदुरबारमधे राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धा आजपासून सुरु झाली. राज्याच्या विविध भागातून २१ वर्ष वयापर्यंतची सुमारे ८०० मुलं - मुली यात सहभागी झाली आहेत. जिल्हाधिकारी मिताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात महाराष्ट्र तिरंदाजी संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर यांच्या हस्ते स्पर्धेचं उद्घाटन झालं. येत्या सोमवारपर्यंत स्पर्धा चालणार आहे.

**<><><><><>**

सोलापूरमध्ये गुटख्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करत ६ लाख ९३ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि १६ लाख रुपये किमतीच्या कारसह एकूण २२ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. तसंच बीडमधल्या बिलाल नगर परिसरात एका घरावर छापा टाकून काल रात्री बीड पोलिसांनी दोन लाख रुपयांचा गुटखा जप्त केला.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात अनेक ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**